दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ३९ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.३ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# शिंदेंनी महायुतीचे अध्यक्ष म्हणून काम पाहावे-रामदास आठवले

## विकासाच्या मुद्द्यावर सरकार बनवण्याची त्यांची भूमिका

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महायुतीमध्ये एकनाथ शिंदे नाराज असणे स्वाभाविक आहे. आपल्याला मुख्यमंत्री होण्याची पुन्हा संधी मिळणार की नाही, अशी त्यांना शंका आहे. शिंदे उपमुख्यमंत्री होतील, असे मला वाटत नाही. परंतु, त्यांनी महायुतीचे अध्यक्ष पदाची जबाबदारी द्यावी, असा प्रस्ताव महायुतीतील घटक पक्ष रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी भाजप वरिष्ठांसमोर मांडला आहे.मुख्यमंत्री पदाबाबत भाजपचे वरिष्ठ जो निर्णय घेतील, तो शिवसेनेला मान्य असल्याचे एकनाथ शिंदे यांनी याआधीच स्पष्ट केले आहे. परंतु, एकनाथ शिंदे नवीन सरकारमध्ये कोणत्या भूमिकेत दिसतील, हे अद्यापही एक कोडेच आहे. अशातच रामदास आठवले यांनी दिलेल्या प्रस्तावावर भाजपचे पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात. त्यांनी निर्णय घेतला, तर एकनाथ शिंदे तो स्वीकारतील का हे पहावे लागणार आहे.

रामदास आठवले म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी नाराज होणे स्वाभाविक आहे. ते मागील अडीच वर्ष राज्याचे मुख्यमंत्री होते आणि आता पुन्हा मुख्यमंत्री होण्याची संधी मिळणार की नाही, याबाबत त्यांना शंका आहे. मात्र असे असले तरी विकासाच्या मुद्द्यावर महायुतीचे सरकार बनायला हवे, अशी त्यांची भूमिका आहे. एकनाथ शिंदे हे स्वत: उपमुख्यमंत्री होतील, असे मला वाटत नाही. मात्र त्यांना महायुतीचे अध्यक्ष म्हणून काम पाहावे. या माध्यमातून ते सरकारवर नियंत्रण ठेवू शकतात. त्यामुळे त्यांना हे पद देण्यात यावे, असे मला वाटत असल्याचे रामदास आठवले म्हणाले.

दरम्यान, दरे गावाहून परतल्यानंतर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आपल्या आमदारांची बैठक बोलावली होती. मात्र, ही बैठक रद्द करण्यात आली असून दिवसभरातील सर्व बैठकी रद्द करण्यात आल्या आहेत. डॉक्टरांनी आरामाचा सल्ला दिल्याने शिंदेंनी बैठक रद्द केल्याची माहिती आहे. त्यामुळे ते ठाण्यातील शुभदीप या बंगल्यावर आराम करीत आहेत. ताप आणि थ्रोट इन्फेक्शन झाल्याने त्यांना डॉक्टरांनी आरामाचा सल्ला दिला आहे.दरम्यान, विधानसभा निवडणुकीत भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. पण अद्यापही त्यांना सरकार स्थापन करण्यात यश आले नाही. नवीन सरकारच्या शपथविधीसाठी ५ डिसेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. मुंबईतील आझाद मैदानावर हा शपथविधी सोहळा होणार आहे. या सोहळ्यासाठी जय्यत तयारी करण्यात येत असून पंतप्रधान मोदी यांच्यासह अनेक व्हीआयपी उपस्थिती राहणार आहेत. भाजपने मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित केले आहे. आता केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे.



# मुल तालुक्यातील धान खरेदी साठी दोन नोंदणी केंद्र वाढवा

## आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पणन अधिकारी यांना सूचना

**मुल । प्रतिनिधी**

मुल तालुक्यातील बाजार समितीच्या धान खरेदी केंद्रावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. मुदत वाढवून दिली असली तरीही गर्दीमुळे शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणीसाठी अडचणी येत आहेत. अशात बेंबाळ व चिरोली गावांमध्ये दोन ऑनलाईन नोंदणी केंद्र वाढवून देण्यात यावे, अशा सूचना मा. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हा पणन अधिकारी यांना दिल्या आहेत.



दोन ऑनलाईन नोंदणी केंद्र वाढविणे नितांत गरजचेचे असल्याची बाब मुलचे माजी पंचायत समिती सभापती चंदू मारगोनवार व भाजप नेते प्रवीण मोहुर्ले व त्यांच्या शिष्टमंडळांनी निदर्शनास आणून दिली होती. तातडीने दखल घेत मा. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हा पणन अधिकारी ऑनलाइन नोंदणी केंद्र वाढवून देण्याच्या संदर्भात सूचना केल्या आहेत. मुल बाजार समितीला एकच नोंदणी केंद्र आहे. त्यामुळे मुल तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर या नोंदणी केंद्रावर गर्दी करीत आहेत. अशात कुणीही धान बोनसच्या नोंदणीपासून वंचित राहू नये यासाठी, मा. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हा पणन अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. दोन ऑनलाईन नोंदणी केंद्रामुळे बेंबाळ व चिरोली परिसरातील नागरिकांना दिलासा मिळेल, असे मा.आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

## भाजपचा मुख्यमंत्री होत असेल तर गृहमंत्रीपद शिवसेनेकडेच

# शिंदेंच्या पक्षातील नेत्याचा दावा खासदार संजय राऊत यांनाही प्रत्युत्तर

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री पद जर भारतीय जनता पक्षाकडे जात असेल तर गृहमंत्री पद उपमुख्यमंत्र्यांकडे असते, असे एक संकेत असतात. त्यामुळे जर भाजपचा मुख्यमंत्री होत असेल तर गृहमंत्रीपद शिवसेनेकडे येईल, असा दावा संजय शिरसाट यांनी केला आहे. मुंबईमध्ये त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी संजय राऊत यांच्यावर देखील जोरदार टीका केली.



मुख्यमंत्री पद जर भारतीय जनता पक्षाकडे असेल, तर गृहमंत्री पद हे शिवसेनेकडे असेल, हे महायुतीसाठी चांगले आहे. मात्र याचा निर्णय तिन्ही पक्षाच्या नेत्यांनी एकत्र बसून घेणे बाकी असल्याचे शिरसाट यांनी म्हटले आहे. या माध्यमातून शिरसाट यांनी गृहमंत्री पदावर दावा केला आहे. निवडणुकीच्या काळात पक्षविरोधी काम करणाऱ्यांवर देखील एकनाथ शिंदे हे लवकरच कारवाई करतील, असा दावा देखील त्यांनी केला आहे. निवडणुकीच्या काळात पक्षातीलच काही नेत्यांनी पक्षविरोधी काम केल्याचे दिसून आले आहे. या संदर्भात सर्वे करण्यासाठी शिंदेंनी काही सर्वेच्या एजन्सी नेमल्या आहेत. त्या एजन्सीच्या अहवालात जर कोणी दोषी आढळून आले असेल तर सरकार स्थापन होण्याच्या आधीच त्याच्यावर कारवाई केली जाईल, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून आता आठ दिवस होऊन गेले असले तरी अद्याप राज्यात सरकार स्थापन झालेले नाही. यामुळे महायुतीमध्ये मतभेद असल्याचा आरोप विरोधी पक्षांच्या वतीने करण्यात येत आहे. त्याला संजय शिरसाट यांनी प्रत्युत्तर दिले आहे. भारतीय जनता पक्षाचाच मुख्यमंत्री होणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे. मात्र, मुख्यमंत्रीपदी कोण? याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

# मृत कामगारांच्या कुटूंबियांना तात्काळ आर्थिक मदत द्या

## आमदार सुधाकर अडबाले यांचे कंपनी व्यवस्थापनास निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ताडाळी एमआयडीसी येथील ओमॅट वेस्ट लिमिटेड (जुने सिद्धबली इस्पात लिमि.) या कंपनीमध्ये १३ ऑक्टोंबर २०२४ रोजी अजय रवींद्र राम (रा. बिहार) या कामगाराचा २०० किलो स्टील स्क्रॅप अंगावर पडल्याने मृत्यू झाला होता. सदर कामगाराच्या कुटूंबियांना कुठलाही मोबदला न देता कंपनी व्यवस्थापनाने मृतदेह त्याच्या मूळगावी पाठवून दिला. तसेच पाच महिन्यांपूर्वी याच कंपनीत श्यामसुंदर ठेंगणे या कामगाराचा मृत्यू झाला होता. त्याला सुध्दा ठरल्याप्रमाणे पूर्ण मदत देण्यात आली नाही. याची दखल घेत आमदार सुधाकर अडबाले यांनी सहायक कामगार आयुक्त यांच्या दालनात कंपनी व्यवस्थापनासोबत बैठक घेऊन दोन्ही मृत कामगारांच्या कुटूंबियांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी, असे निर्देश दिले.



ओमॅट वेस्ट लिमिटेड (जुने सिद्धबली इस्पात लिमि.) कंपनीमध्ये मागील महिन्यात झालेल्या घटनेनंतर आमदार सुधाकर अडबाले यांनी कंपनीला भेट देऊन पाहणी केली असता अनेक गंभीर बाबी दिसून आल्या. मृत्यू झालेल्या कामगारास तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी व कंपनी व्यवस्थापकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कंपनीची सखोल चौकशी करावी, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी उद्योग व कामगार विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. त्यानंतर सहायक कामगार आयुक्त चंद्रपूर यांनी आमदार सुधाकर अडबाले यांच्या उपस्थितीत कंपनी व्यवस्थापनासोबत बैठक लावली.कंपनीतील मृत अजय रवींद्र राम या कामगारास आर्थिक मदत देण्याबाबत काय कार्यवाही केली, अशी विचारणा आमदार अडबाले यांनी केली. यावर सध्या २ लाख रूपये कामगाराचे वारसदाराला दिलेले असून उर्वरित नुकसानभरपाईची रक्कम नियमानुसार देण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच जून महिन्यात सदर कंपनीत श्यामसुंदर ठेंगणे या कामगाराचा मृत्यू झाला होता. त्यास ४५ लक्ष वारसदारांना देण्यात येईल, असे कंपनी व्यवस्थापनाने मान्य केले होते. त्यातील ३० लक्ष देण्यात आले असून १५ लक्ष रुपये आतापर्यंत कंपनीने का दिले नाही, याची विचारणा केली. याबाबत उर्वरित रक्कम नियमानुसार देण्यात येईल, असे कंपनी व्यवस्थापकांनी सांगितले.

सोबतच सदर कंपनीचे स्ट्रक्चरल ऑडिट, कंपनीत कामगारांना सुरक्षेच्या दृष्टीने पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, प्रदूषण नियंत्रणार्थ उपाययोजना, शेतपिकांचे होणारे नुकसान, परप्रांतीय कामगारांचे पोलिस व्हेरिफिकेशन, कामगारांना नियमानुसार वेतन व इतर बाबींवर चर्चा करण्यात आली असून या सर्व बाबींची सविस्तर माहिती सहायक कामगार आयुक्तांनी द्यावी, अश्या सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी केल्या. तसेच याच विषयांवर जिल्हाधिकारी, फॅक्टरी निरीक्षक, सहायक कामगार आयुक्त यांच्यासोबत कंपनी व्यवस्थापनाची बैठक लावणार असल्याचे आमदार अडबाले यांनी सांगितले.बैठकीला सहायक कामगार आयुक्त श्री. धुर्वे, ताडाळी उपसरपंच निखीलेश चामरे, प्रा. रवी झाडे व कंपनी अधिकारी उपस्थित होते.

# राजकारण हे असंतुष्ट आत्म्यांचा महासागर आज नगरसेवकापासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वचजण दु:खी-नितीन गडकरी यांच्या विधानाची चर्चा

**नागपूर (वृत्तसंस्था)**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आपल्या रोखठोक विधानांसाठी कायमच चर्चेत असतात. सध्या राज्यात सुरू असलेल्या राजकीय परिस्थितीवरही त्यांनी भाष्य केले. नितीन गडकरी यांनी राजकारणाला 'असंतुष्ट आत्म्यांचा महासागर' अशी उपमा दिली आहे. राजकारणात प्रत्येक व्यक्ती दु:खी असतो आणि नेहमीच सध्याच्या पदापेक्षा वरच्या पदाची आकांक्षा बाळगतो, असेही ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे चर्चांना उधाण आले आहे.



नागपूर येथे रविवारी 'जीवनाचे ५० स्वर्णिय नियम' या पुस्तकाचे नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात त्यांनी सध्या राज्यात सुरू असलेल्या घडामोडींवर रोखठोक भाष्य केले. राजकारणात महत्त्वाकांक्षा कशी वाढली आहे, याची व्याख्याही त्यांनी केली.

नितीन गडकरी म्हणाले, राजकारण संतुष्ट आत्म्यांचा महासागर आहे. राजकारणात सर्वच लोक दु:खी आहेत. नगरसेवकाला नाराज असतो कारण त्याला आमदार होता नाही आले. एक आमदार यासाठी नाराज असतो कारण त्याचा मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. मंत्री दु:खी असतो कारण त्याला चांगले खाते भेटत नाही आणि ते मुख्यमंत्री होऊ शकले नाही. तर मुख्यमंत्री देखील तणावात असतो कारण पक्षश्रेष्ठी त्यांना कधी ठेवतील आणि बाजुला करतील याची त्याला भीती असते, असे वक्तव्य नितीन गडकरी यांनी केले.

पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, जीवन हा तडजोडी, मजबुरी, अडथळे आणि विरोधाभासांचा खेळ आहे. कौटुंबिक, सामाजिक, राजकीय किंवा कॉर्पोरेट जीवन असो, जीवन आव्हाने आणि समस्यांनी भरलेले असते. त्यांचा सामना करण्यासाठी आपल्याला 'आर्ट ऑफ लिव्हिंग' समजून घ्यावे लागेल.

नितीन गडकरी म्हणाले की, त्यांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांना अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्या आत्मचरित्रातील एक कोट आठवतो, ज्यात म्हटले आहे की, 'माणूस जेव्हा पराभूत होतो तेव्हा तो संपत नाही. जेव्हा तो हार मानतो तेव्हा तो संपतो. नितीन गडकरी यांनी आनंदी जीवनासाठी चांगल्या मानवी मूल्यांवर आणि संस्कारांवर भर दिला. जीवन जगण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी त्यांनी आपले आदर्श आणि नियम सांगताना 'व्यक्ती, पक्ष आणि पक्ष तत्त्वज्ञान' याचे महत्त्व अधोरेखित केले.

# मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री पदच नव्हे तर इतरही कारणामुळे सरकार पेचात:संजय राऊत यांनी व्यक्त केली शंका; मोदी-शहांवरही निशाणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून आठ दिवस झाले असले तरी अद्याप सरकार स्थापन झालेले नाही. या संदर्भात उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. केवळ मुख्यमंत्री पद किंवा गृहमंत्र्यालयावरुन हा पेच थांबलेला नसल्याची शंका राऊत यांनी उपस्थित केली आहे. फडणवीस यांच्या जागी दुसरा कोणीतरी मुख्यमंत्री असेल का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

महाराष्ट्रात केवळ गृहमंत्री पदामुळे सरकारचा शपथविधी थांबलेला नाही. भाजपने मनात आणले तर मागण्या करणाऱ्यांना ते एका मिनिटात चिरडून टाकतील. मात्र, हे सर्व लोक ईडी, सीबीआयला घाबरुन पळून गेलेले आहेत. निवडून आलेल्यांना जनमताचा पाठींबा अजिबात नसल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. एका गृहमंत्रीपदावरुन सरकार लटकलेले नाही यामागे काही वेगळी कारणे असतील, अशी शंका देखील त्यांनी व्यक्त केली. भाजपने अनेक राज्यांत आपल्या मित्रांबरोबर, स्वतंत्रपणे आणि प्रस्थापित मुख्यमंत्र्यांना डावलून नवीन लोकांना घेऊन सरकार बनवलेले आहे. त्यामुळे हे शिंदे कोण? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. फडणवीसांच्या जागी वेगळे कोणीतरी असेल का? असे प्रश्न आता जनतेच्या मनात निर्माण होत असल्याचेही राऊत यांनी म्हटले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा आणि एकंदरीत भाजपच्या राजकीय स्वार्थामुळे जगभरातील हिंदू संकटात असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. देशामध्ये निवडणुका जिंकण्यासाठी त्यांनी टाकलेल्या ठिणगीचा परिणाम जगभरातील हिंदूंवर झाला असल्याचेही ते म्हणाले. ज्या-ज्या भागात हिंदू मोठ्या प्रमाणात राहतात, त्या भागात हिंदूंवर हल्ले होत असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. त्यासाठी मोदींची निवडणुका जिंकण्यासाठीची धोरणे जबाबदार असल्याचेही ते म्हणाले.

# समाजाला डोळस करणारे झाडीपट्टीतील चंद्रकमल थिएटरचे : 'पापी पुत्र' नाटक

**डॉ.यशवंत घुमे**

मनोरंजनातून प्रबोधन करणाऱ्या तथा रसिकनिष्ठा व नाट्यनिष्ठा जपणाऱ्या झाडीपट्टीतील वेगळ्या पॅटर्नच्या नाटकांचे कौतुक केले जात आहे.मुलाच्या उज्वल भवितव्यासाठी आई-वडिलांनी प्रचंड हालअपेष्टा सोसत पोटाला चिमटा देत खस्ता खात धडपडावे. मुले उच्च शिक्षित व्हावी, यासाठी प्रचंड यातना सहन करीत पदरमोड करणाऱ्या पालकांप्रती मुले बेईमान होतात. याचेच प्रत्यंतर नुकतेच बाल गणेश नाट्य कला मंडळ चेकदरुर, जि. चंद्रपूर आयोजित धनंजय ढवळे लिखित ,चंद्रकमल थिएटर वडसा प्रस्तुत नटसम्राट प्रा.डॉ.शेखर डोंगरे दिग्दर्शित संगीत 'पापी पुत्र' नाटकाचा प्रयोग यशस्वीरित्या संपन्न झाला.हाडाची काडे करून मुलांना शिकविले, शिकून मुले साहेब बनल्यावर धनाढयाच्या मुलीशी प्रेम करून वाहवत जात पूर्वीचे रक्ताचे नाते विसरणाऱ्यां अभयची कहाणी म्हणजेच पापी पुत्र नाटक होय. वासुदेव व देवकी प्रचंड परिश्रमाने मुलाला शिकवतात. भावाच्या शिक्षणासाठी बहीण लक्ष्मी आपली आवड बाजूला ठेवत प्रसंगी बारमध्ये काम करते. इच्छा नसतानाही तिला गुंडाबरोबर लग्न करावे लागते परंतु तोच भाऊ अभय अधिकारी बनल्यावर बायकोच्या अधिनस्थ जाऊन आई-वडील व बहिणीचा तिरस्कार करतो, त्यांच्यावरच घाणेरडे आरोप करत धिक्कारतो , त्यांचा अपमान करतो. अर्थातच आई-वडिलांनी केलेल्या अनंत उपकाराची जाणीव न ठेवता ऋणानुबंध नाकारणाऱ्या पापीपुत्राची कथा म्हणजेच धनंजय ढवळे यांचे 'पापी पुत्र 'हे नाटक होय.बिल्डर शिवशंकर राणावत अभयला हाताशी धरीत केलेल्या गैर कृत्यावर पांघरून घालतो. न्यायासाठी धडपडणाऱ्या ड.पराग पणशीकरांचा आवाज दाबण्यासाठी खून करतो. अशा विविध बाबींना धनंजय ढवळे यांनी कवेत घेत वास्तविक जीवनाशी निगडितनाटक लिहिले आहे. मुलांच्या शिक्षणासाठी धडपडणारा प्रामाणिक, न्यायासाठी धडपडणाऱ्या वासुदेव वसाके (चिदानंद सिडाम), मुलाच्या भवितव्यासाठी हाडाची काडे करणारी सहनशील देवकी (मनिषा देशपांडे), भावाच्या शिक्षणासाठी स्वतःच्या इच्छा आकांक्षांना बाजूला सारत धडपडणारी अन् प्रसंगी दृष्टांच्या नासासाठी पुढाकार घेणारी अग्रगामिणी रणरागिणी लक्ष्मी (पौर्णिमा तायडे), उच्च शिक्षण घेतल्यानंतर रक्ताच्या नात्यांना विसरत प्रेमाच्या पाशात अडकलेला आणि पत्नीच्या सांगण्यानुसार वर्तन करणारा (स्वप्निल बनसोड), वडीलांच्या अपमानाचा बदला घेणारी आई - वडिलांना अभय पासून दूर ठेवणारी, सासू सासरे यांना हाकलणारी, श्रीमंताची लाडकी लेक काजल(ज्ञानेश्वरी प्रभाकर), पैशाच्या बळावर अत्याचार करणारा धनाढय,बिल्डर,दुष्ट ,नराधम, अत्याचारी दडपशाही वृत्तीचा शिवशंकर राणावत (विश्वास पुडके), पैशासाठी क्रूरकर्म करण्यास धजावणारा लालची अत्याचारी सारंग सुरी (लोकेश कुमार उर्फ नोकचंद अंबडारे), बांधिलकी जोपासत अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी धडपडणारा , बिल्डरच्या हलगर्जीपणामुळे चालू इमारतीचे बांधकाम कोसळून त्यात मृत्युमुखी पडलेल्या व अपंगत्व आलेल्या गरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी धडपडणारा, श्रीमंतांच्या पैशाच्या आमिषालाही बळी न पडणारा सच्चा संघर्षरत वकील ड .पराग पणशीकर (प्रा. राजकुमार मुसणे), ड.पराग पणशीकरच्या खुनाचा छडा लावण्यासाठी माफीचा साक्षीदार होण्यासाठी गिरिधरला प्रवृत्त करणारा प्रसंगी अभयची कानउघाडणी करत डोळस करणारा चंदन (प्रा. डॉ.शेखर डोंगरे), पैशासाठी गैरकृत्य करणारा लालची दलाल अन् लग्नासाठी अतिउतावीळ झालेला गिरीधर (के. आत्माराम), विविध युक्त्यातून मार्ग काढणारी नृत्यांगना करुणा (पायल) या प्रमुख कसलेल्या कलावंतांच्या अभिनयाने प्रमुख पात्राच्या माध्यमातून तीन अंकातील पंधरा प्रवेशाद्वारे 'पापी पुत्र 'हे नाटक साकार होते. विशेषत: हरहुंन्नरी सदाबहार कलावंत प्रा.डॉ.शेखर डोंगरे , के .आत्माराम व पायल यांच्या प्रासंगिक वैशिष्ट्यपूर्ण विनोदाने प्रेक्षागृह हसत तल्लीन होते. वाढत्या वयानुसार लग्न न जुळल्यामुळे तडफडणारा, स्त्री आकर्षणाने उतावीळ होत बावरलेला गिरीधर व तेल, मालिश, पैसे व सामान असे वेगवेगळे सल्ले देत गिरीधरला फसविणारा व गिरीधरच्या साक्षीनेच करुणाशी विवाह करणारा चतुर चंदन, या त्रिकुटामुळे प्रेक्षागृहात प्रेक्षक पोट भरून हसतात.शिवाय करुणा: 'लग्न करणारा पंधरा दिवसांनी मरणार ' अशा हास्योत्पादक कलृप्तीने प्रेक्षक हसत लोटपोट होतात. लग्न करण्याविषयी वेगवेगळे सल्ले देणाऱ्या चंदनमुळे गिरीधर फसला जातो. प्रसंगी बावरलेला गिरीधर करुणांकडून मार खातो. अशा सुखद



धक्क्याने प्रेक्षक आनंदी होतो.

लेखक धनंजय ढवळे यांची ओजस्वी लेखणी,दिग्दर्शकाची कल्पकता व सर्व कलावंतांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे झाडीपट्टीत 'पापी पुत्र' हे नाटक रसिकप्रिय ठरले. खेळम्याले , घुबडतोंड्या यासारख्या झाडीबोलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्दोच्चाराने हशा पिकतो. संगीत 'पापी पुत्र' या नाटकातील' या 'घरात लपला स्वर्ग जणू धरतीवरचा, वसंत फुलला हिंदोळ्यावर प्रीतीचा', 'साजणे झालो ग तुझा दिवाना', 'आहे अधुरा मी तुझ्याविना ','उघडताच पापण्या नयन माझे दीपले'या स्वप्नील बनसोड यांच्या उत्तम स्वरसाजानी बहरलेल्या गीतांमुळे व 'नाच शालू नाच', तू जवा बघतीस माझ्याकडे,' डोकं फिरलया' या शेखर डोंगरे यांच्या विनोदी शैलीतील गायनाने, प्रीत आपुली सख्या नाते हे जुळले, सांगू कसे मी तुला माझ्या मनातले' या पौर्णिमा तायडे यांच्या प्रेमाभिलाषा व्यक्त करणाऱ्या गीत गायनाने नाट्यप्रयोगात चांगलीच रंगत आणली आहे.

नाटकातील संवादही पात्राला न्याय देणारे आहेत.शिवशंकर राणावत :'कलेक्टर तुने जाना नहीं मेरा कॅरेक्टर ',अभय: (आई वडिलांना) आयुष्याची राखरांगोळी केलत माझ्या तुम्ही. असे म्हणत वडिलांवर हात उगारणारा पापी पुत्र अभयचे (स्वप्नील बनसोड) दृश्य पाहताना तद्वतच इमानदार कुत्र्यासारखे भुंकणे, पायातील जुता डोक्यावर ठेवणे, या शिवशंकर राणावतच्या अटीने व मुलगा कलेक्टर असतानाही माय -बापाना भीक मागावी लागते ,हे दृश्य पाहून प्रेक्षक हळहळतो.

पापाच्या प्रायशचिताने काजल स्वतःवर गोळी घालून जीवन संपविते, सर्वस्व गमावल्याच्या व्यथेने लक्ष्मी, वासुदेव, देवकी विष प्राशन करतात. बिल्डरची चालू बांधकामाची इमारत कोसळल्याने मृत्युमुखी पडलेल्या व अपंगत्व आलेल्या कामगार मजुरांची किस लढणाऱ्या, तर गरीब अन्यायांना न्याय मिळवून देण्यासाठी बांधिलकीने धडपडणाऱ्या ड .पराग पणशीकराचा आवाज दाबण्यासाठी खलनायक शिवशंकर राणावत त्याचा खून करतो. अपमान, बदला, सूड व खून याचेच नाटक आहे. मनमानीपणा, अत्याचार , नात्यातील दुरावा, गैरसमज, लग्नासाठीची धडपड, न्यायाचा संघर्ष , दडपशाही, त्याग असे अनेक विषय नाटककाराने हाताळले आहेत.भविष्यासाठी निष्कलंक चारित्र्य प्रमाणपत्र मिळावे म्हणून अभय आई, वडील, बहीणीस. धिक्कारतो, तेव्हा वासुदेव पापी पुत्र आहेस तू' म्हणतो. तिसऱ्या अंकातील या प्रवेशातील चिदानंद सिडाम, मनीषा देशपांडे व पोर्णिमा तायडे यांचे व दुसऱ्या अंकातील पाचवा प्रवेश व तिसऱ्या अंकातील पाचव्या प्रवेशातील जिव्हारी बोचणाऱ्या संवादाने व अभिनयाने प्रेक्षकांच्या डोळ्यातून अश्रू येतात. अंत:करण हेलावून टाकणारे हे दृश्य पाहून गदगदायला लागतात.

पत्नी प्रेमात डुबलेल्या अभयच्या विपरीत वर्तनावर भाष्य करणारे पापी पुत्र हे नाटक आहे. भाऊ शिकून चांगला अधिकारी झाला पाहिजे यासाठी स्वतःच्या अस्तित्वाचाही विचार न करता मनाविरुद्ध असणाऱ्या पुरुषाशी विवाह करून प्रसंगी बारमध्ये नृत्य करून शिक्षणासाठी धडपड करणाऱ्या बहिणीची व्यथा म्हणजे हे नाटक आहे. वात्सल्यप्रेमाने विव्हळणाऱ्या मायबापांची व्यथा म्हणजे हे नाटक आहे. आई-वडिलांच्या कर्तव्यापासून उदासीन होत नवीन पिढी दूर जात असल्याचे वास्तव मांडणारे हे नाटक आहे. किंबहुना क्षणिक कृत्रिम सुखाच्या मागे धावताना जन्मदात्यांना लाथाडणाऱ्या नव्या पिढीचे ज्वलंत वास्तव चित्र दर्शविणारे हे नाटक आहे. स्व कष्टाने संसाराचा डोलारा पिलवीत स्वतःच्या मुलांचे जीवन फुलवू पाहणाऱ्या माय- बापांची ही कथा आहे भावाचे आयुष्य उभे करण्यासाठी स्वतःच्या आयुष्य उध्वस्त करणाऱ्या बहिणीची ही कथा आहे मायबापाच्या व बहिणीच्या त्यागाला विसरणाऱ्या दगाबाज पापी पुत्राची ही कथा म्हणजे हे नाटक. नात्याची पडझड दर्शविणारे , आपलेपणा आटत चालल्याचे वास्तवचित्र दर्शवीत रसिक प्रेक्षकांना डोळस बनवित अंतर्मुख करणारे 'पापी पुत्र' नाटक आहे. उत्तम नाट्यानुभवासाठी प्रत्यक्ष नाटयास्वाद घेणे.

प्रसंगानुरूप प्रवेशाकरिता केलेला पडद्याचा समर्पक वापर व तुटपुंज्या नेपथ्यावर पण प्रभावीपणे साकार होणारे नाटक आहे. वास्तविक समाज जीवनाशी निगडित नाट्याशय, असे वाहक श्रवणीय संगीत, वादन, गायन व झाडीपट्टीतील नावाजलेल्या कसदार कलावंतांचा अभिनयामुळे नाटय प्रयोगात सरसता आली.निश्चितच मनोरंजन व प्रबोधनाने समाजाला डोळस करणारे 'पापी पुत्र' हे झाडीपट्टी रंगभूमीवरील उत्तम दर्जाचे नाटक प्रेक्षकांनी आवर्जून पहावे असे आहे.

# भिसी येथे दोन लाखाचा सुगंधीत तंबाखू एलसीबीने केला जप्त

**चिमूर । शेषराव राऊत**




चंद्रपूर जिल्हा एलसीबी विभागाने अवैध धंद्यावर कंबर कसली असून जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधु, यांच्या आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कोंडावार, यांनी पथक तयार करून जिल्ह्यातील विविध अवैध धंद्यावर कारवाईची मालिका सुरू केली आहे. याच श्रेणीत चिमूर तालुक्यातील पोलीस स्टेशन भिसी हद्दीत शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित तंबाखूची अवैद्यरित्या विक्री करणाऱ्या २ आरोपींविरुद्ध एलसीबी पथकाने कारवाई केली आहे. सदर कारवाईत नंबर ईगल सुगंधित तंबाखू एकूण ४३८ नग प्रत्येकी २०० ग्रॅम, किंमत (एमआरपी) प्रमाणे १ लाख, ३५ हजार ७८० रूपये. होला हक्का शिशा तंबाखू (प्रत्येकी २०० ग्रॅम वजनाचे ४१ पॅकेट) एकूण २०५ नग पाऊच, किंमत (एमआरपी प्रमाणे) ३३ हजार ६२० रुपये. हुक्का शिशा तंबाखू (प्रत्येकी ४० ग्रॅम वजनाचे ७ पॉकेट) एकूण ८४ नग किंमत (एमआरपी प्रमाणे) ३ हजार ३६० रुपये. ( इगल हुक्का शिशा तंबाखू (प्रत्येकी ४०० ग्रॅम वजनाचे ३३ पॉकेट) ३३० पाऊच, किंमत (एमआरपी प्रमाणे) २१ हजार १२० रुपये. असा एकूण १ लाख, ९३ हजार, ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पोलिस स्टेशन भिसी येथे आरोपींविरुद्ध संबंधित कलमानुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. आरोपी आणि जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशन भिसी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई सफौ. धनराज करकाडे, स्वामीदास चालेकर, पोहवा. नीतीन कुरेकार, अजय बागेसर, पोकॉ. प्रशांत नागोसे, शशांक बदामवार, चापोहवा. दिनेश अराडे, यांनी केली आहे.

# पाथर्डीत ईव्हीएम विरोधात निदर्शने

## प्रतिकात्मक मशिनचे दहन



**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डीत आमदार रोहित पवार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरचिटणीस ॲड. प्रताप ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली प्रतिकात्मक ईव्हीएम मशिनचे तहसील कार्यालयासमोर दहन करून जोरदार निदर्शने करण्यात आली.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमच्या माध्यमातून मतदानात कथित घोटाळा झाल्याचा आरोप करत घोषणाबाजी करण्यात आली. निवडणुकीतील निकालाच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करत, निदर्शकांनी या प्रकाराचा निषेध व्यक्त केला. या निदर्शनात राणीताई लंके, योगिता राजळे, सविता भापकर, सुभाष केकाण, बंडू बोरुडे, राजेंद्र दौंड, नाशिर शेख, सचिन नागपुरे, वजीर पठाण, हरिष भारदे, डॉ. राजेंद्र खेडकर यांसह शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना (उबाठा गट), कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# राहुरीतील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा-मा.विरोधी पक्षनेते शिवाजीराव सोनवणे यांची मागणी

**राहुरी । प्रतिनिधी**



राहुरी शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळत झाला असून या कुत्र्यांच्या आक्रमकपणामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः महिला ,शालेय विद्यार्थ्यांसाठी रस्त्यावरून चालणे धाडसाचे ठरत आहे . या कुत्र्यांच्या वाढत्या प्रमाणावर तातडीने लक्ष देऊन त्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी राहुरी नगरपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते शिवाजीराव सोनवणे पाटील यांनी केली आहे. राहुरी शहराच्या गल्लीबोळात मोकाट कुत्र्यांच्या टोळ्या धुमाकूळ घालत आहे या कुत्र्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत अनेक वेळा या कुत्र्यांनी नागरिकांना चावा घेतला असून रस्त्यावर किंवा भरपेठेत कुत्र्यांमध्ये झुंज झाल्यामुळे दुचाकी स्वार तसेच महिलांना अचानक अडथळे आल्याने अनेक दुर्घटना घडल्या आहेत. काही कुत्र्यांमध्ये पिसाळलेल्या असल्याची लक्षणे दिसत असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका संभवू शकतो . राहुरी शहरात आहे या परिस्थितीवर त्वरित उपाययोजना आवश्यक आहे शिवाजीराव सोनवणे यांनी नगरपरिषदेवर उपस्थित केलेल्या या मागणीला शहरातील नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे त्यांनी नगर परिषदेच्या प्रशासनाला त्वरित पावले उचलून राहुरी शहरातील नागरिकांसाठी सुरक्षित आणि सुसह्य वातावरण निर्माण करण्याची मागणी केली आहे.

# बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराचा निषेध विश्व हिंदू परिषद व बजरंग दलचे निवेदन

**पुलगाव । प्रतिनिधी**



बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार तसेच धार्मिक संत चिन्मय कृष्ण दास प्रभू यांच्या अटकेचा निषेध करत विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल, पुलगाव प्रखंडाने तहसील कार्यालयात निवेदन दिले. बांगलादेशात इस्लामिक कट्टरतावादी, जिहादी, आणि अतिरेकी घटकांकडून हिंदू, दलित आणि अन्य अल्पसंख्याकांवर अत्याचार, मंदिरे आणि पुतळ्यांची विटंबना, तसेच संपत्तीची लूट सुरूच आहे. बांगलादेश सरकार अशा घटनांवर ठोस पावले उचलण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

हिंदू समाजाला जागृत करण्यासाठी काम करणारे संत चिन्मय कृष्ण दास प्रभू यांना अटक करून त्यांची जामीन अर्ज नाकारण्यात आली आहे. यामुळे हिंदू समाजात रोष निर्माण झाला असून, त्यांची तत्काळ सुटका करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनाद्वारे बांगलादेशातील हिंदूवर होणाऱ्या अत्याचारांवर भारत सरकारने तातडीने लक्ष घालावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रपती, पंतप्रधान, आणि गृहमंत्री यांना निवेदनाद्वारे हिंदू समाजाच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलण्याची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाद्वारे हिंदू समाजाच्या हक्कांसाठी जागतिक स्तरावर आवाज उठवण्याची आवश्यकता असल्याचे बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदने स्पष्ट केले.

# विभागीय वाहतूक अधिकारी विजय धायडे यांचा सेवानिवृत्ती सोहळा संपन्न

**वर्धा । प्रतिनिधी**



राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धा विभागीय कार्यालयात कार्यरत असलेले विभागीय वाहतूक अधिकारी विजय धायडे यांचा सेवानिवृत्ती सोहळा दिनांक ३० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला. धायडे यांनी ३१ वर्षांची प्रदीर्घ सेवा पूर्ण करून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती पत्करली.

धायडे यांनी वाहतूक निरीक्षक, सहाय्यक वाहतूक अधीक्षक, विभागीय वाहतूक अधीक्षक आणि विभागीय वाहतूक अधिकारी अशा विविध पदांवर कार्य करत महामंडळाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी नियोजन, संचालन आणि नफा वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे वर्धा विभाग अग्रगण्य ठरला. त्यांच्या मोलाच्या कार्यामुळे वर्धा विभागात त्यांचे नाव आदराने घेतले जाते.

सेवानिवृत्ती कार्यक्रमाला नागपूर आणि अमरावती विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गभने, विभाग नियंत्रक तथा यंत्र अभियंता प्रतापसिंह राठोड, वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी किशोर आदमने, विभागीय वाहतूक अधीक्षक उजवणे तसेच इतर अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्रमिक संघटनांचे पदाधिकारी आणि विविध संघटनांचे कर्मचारीही सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाहतूक शाखेच्या कर्मचार्यांनी विशेष परिश्रम घेतले. धायडे यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांचा पुढील जीवनासाठी शुभेच्छा देत उपस्थितांनी त्यांचे योगदान कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

# संजय देशपांडे यांचा सेवानिवृत्ती सोहळा संपन्न

**वर्धा । प्रतिनिधी**

विमेन्स एज्युकेशन सोसायटी संचालित केसरीमल कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी शिक्षकेत्तर कर्मचारी संजय देशपांडे यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव पंडित होते, तर मंचावर संस्थेचे सदस्य डॉ. श्रीरंग पंडित, प्राचार्या धनिष्ठा बोरुटकर, सत्कारमूर्ती संजय देशपांडे आणि त्यांची अर्धांगिनी स्मिता देशपांडे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता शारदेच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीप प्रज्वलनाने झाली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, आणि भेटवस्तू देऊन देशपांडे दाम्पत्याचा सन्मान करण्यात आला. प्रा. राठोड यांनी देशपांडे यांच्या सेवाकाळातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव केला, तर डॉ. श्रीरंग पंडित यांनी त्यांच्या तुटपुंज्या पगारावरही मुलांना चांगले शिक्षण आणि संस्कार दिल्याचे कौतुक केले.

प्राचार्या बोरुटकर यांनीही देशपांडे यांच्या कामगिरीची प्रशंसा करून शुभेच्छा दिल्या.

सत्कारमूर्ती संजय देशपांडे यांनी आपल्या मनोगतातून भावुक शब्दांत शाळेत घालवलेल्या क्षणांना उजाळा दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माधव पंडित यांनी देशपांडे यांच्या प्रामाणिक सेवेसाठी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी नितीन वाघ यांनी या जन्मावर, या जगण्यावर हे गीत सादर करून माहोल भावूक केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमोल वाशिमकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन वखरे यांनी केले. या सोहळ्याला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक आणि कर्मचार्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.



# अहिल्यानगर जिल्ह्यात ७४ वर्षात २२ जणांना राज्याच्या मंत्रिमंडळात संधी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



अहिल्यानगर :गेल्या ७४ वर्षांत बाळासाहेब भारदे, बी. जे. खताळ, रामराव आदिक, शंकरराव कोल्हे, गोविंदराव आदिक, दादासाहेब रुपवते, मधुकर पिचड, बाळासाहेब थोरात, राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह जिल्ह्यातील २२ जणांना राज्याच्या मंत्रिमंडळात संधी मिळालेली आहे.

कॅबिनेट मंत्रीपदी संधी मिळालेल्या बहुतांश नेत्यांनी राज्यभरात आपापल्या कामाचा ठसा उमटविला आहे. पंधराव्या विधानसभेत महायुतीला बहुमत मिळाले आहे. त्यामुळे यंदा कोणाकोणाची मंत्रिमंडळात वर्णी लागणार याची उत्सुकता वाढली आहे.

१९५१ ते २०२४ पर्यंत विधानसभेच्या १५ सार्वत्रिक निवडणुका झाल्या आहेत. पहिल्या दोन निवडणुका मुंबई राज्य म्हणून झालेल्या आहेत. मुंबई राज्य मंत्रिमंडळात बाळासाहेब भारदे यांना सहकारमंत्री म्हणून संधी मिळाली होती. राहुरीचे पहिले आमदार लक्ष्मणराव पाटील यांना देखील राज्यमंत्रिपद मिळाले होते.

महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर १९६२ पासून विधानसभा निवडणुका सुरू झाल्या. वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात संगमनेरचे बी. जे. खताळ, श्रीगोद्याचे बाबूराव भारस्कर यांना संधी मिळाली होती. खताळ पाटील पहिल्यांदा राज्यमंत्री झाले होते. भारस्कर यांना समाजकल्याण मंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली. कर्जतचे एकनाथराव निंबाळकर यांची देखील काही काळ ग्रामविकास राज्यमंत्री म्हणून निवड झाली होती. १९७५ मध्ये शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर खताळ पाटलांना मंत्रिपदाची संधी मिळाली होती. त्यानंतर १९८० मध्ये देखील ते कॅबिनेट मंत्री झाले होते.

१९७८ मध्ये शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकारमध्ये गोविंदराव आदिक यांना पाटबंधारे, शंकरराव काळे यांना सहकार व शिक्षण, दादासाहेब रुपवते यांना समाजकल्याण, तर पाथर्डीचे आमदार बबनराव ढाकणे यांना सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्रिपद मिळाले होते. १९८० मध्ये अहमदनगरचे (आता अहिल्यानगर) प्रा. एस. एम. आय. असीर कॅबिनेटमंत्री झाले होते. १९८३ मध्ये वसंतदादा पाटील मंत्रिमंडळात जिल्ह्याचे रहिवासी असलेले परंतु मुंबईत राजकीय कारकीर्द सुरू असलेले रामराव आदिक यांना उपमुख्यमंत्री होण्याची संधी मिळाली होती. १९८५ ते १९९५ या कालावधीत मधुकरराव पिचड, अण्णासाहेब म्हस्के, बबनराव पाचपुते यांना राज्यमंत्रिपद मिळाले होते. याच कालावधीत शंकरराव कोल्हे, रामराव आदिक आदींना कॅबिनेट मंत्रिपदाची संधी मिळाली होती.

१९९५ मध्ये राज्यातील शिवसेना-भाजपचे सरकारमध्ये नगरचे अनिल राठोड यांना सहा महिने राज्यमंत्रिपद तर राधाकृष्ण विखे पाटील यांना थेट कृषी, पशुसंवर्धन मंत्रिपदाची संधी मिळाली होती.

१९९९ मध्ये मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळात बाळासाहेब थोरात यांना पाटबंधारे राज्यमंत्रिपद मिळाले. याच मंत्रिमंडळात गोविंदराव आदिक यांना देखील संधी मिळाली होती. त्यानंतर २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या कालावधीत मधुकरराव पिचड, बाळासाहेब थोरात, राधाकृष्ण विखे पाटील, बबनराव पाचपुते, शिवाजीराव कर्डिले आदींना विविध खात्याचे मंत्रिपद सांभाळण्याची संधी मिळाली होती. २०१४ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात प्रा. राम शिंदे कॅबिनेट मंत्री झाले. फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात २०१९ ची लोकसभा निवडणूक झाल्यानंतर राधाकृष्ण विखे पाटील यांची काही महिने गृहनिर्माण मंत्रिपदी वर्णी लागली होती.

२०१९ मध्ये पहिले अडीच वर्षांत बाळासाहेब थोरात व शंकरराव गडाख यांची मंत्रिमंडळात निवड झाली होती. त्यानंतर शेवटच्या अडीच वर्षे एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात एकमेव राधाकृष्ण विखे पाटील यांना मंत्रिपदाची संधी मिळाली होती.

एकंदरीत ७४ वर्षांत जिल्ह्यातील २२ आमदारांना राज्य मंत्रिमंडळात मंत्रिपदाची संधी मिळालेली आहे.बाळासाहेब भारदे मुख्यमंत्री वसंतराव नाईकांच्या काळात विधानसभेचे अध्यक्ष होते. त्यानंतर बबनराव ढाकणे, विजयराव औटी यांना उपाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली होती. दत्ता देशमुख, बबनराव ढाकणे काही काळ राज्याचे विरोधी पक्षनेते होते. १९९५ युती सरकारच्या काळात मधुकरराव पिचड तर २०१४ युती सरकारच्या काळात राधाकृष्ण विखे पाटील साडेचार वर्षे विरोधी पक्षनेते होते.महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर १९६२ पासून विधानसभा निवडणुका सुरू झाल्या. वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात संगमनेरचे बी. जे. खताळ, श्रीगोद्याचे बाबूराव भारस्कर यांना संधी मिळाली होती. खताळ पाटील पहिल्यांदा राज्यमंत्री झाले होते. भारस्कर यांना समाजकल्याण मंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली. कर्जतचे एकनाथराव निंबाळकर यांची देखील काही काळ ग्रामविकास राज्यमंत्री म्हणून निवड झाली होती. १९७५ मध्ये शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर खताळ पाटलांना मंत्रिपदाची संधी मिळाली होती. त्यानंतर १९८० मध्ये देखील ते कॅबिनेट मंत्री झाले होते.

## तक्रार देऊनही काहीच झाले नाही, मग महिलांनीच जाळला अवैध दारूचा अड्डा



**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी :श्रीरामपूर तालुक्यात गोदावरी पट्ट्यातील रामपूरवाडी-कोकरे येथे आक्रमक महिलांनी अवैध दारूचा अड्डा जाळला. यावेळी रामपूर रस्त्यावर एका हॉटेलमध्ये अवैध दारू विकी सुरू होती.

हे लक्षात येताच महिलांनी आपला मोर्चा त्या दुकानाकडे वळवला. दुकानातील दारूच्या बाटल्या फोडल्या. ही घटना रविवारी (दि.१) सकाळी घडली. महिलांनी केलेल्या या धडक कारवाईची परिसरात चर्चा सुरू आहे.

रामपूर-कोकरे येथील महिलांनी अचानक अवैध दारू धंद्याविरोधात हत्यार उपसल्याने गोदावरी पट्ट्यातील महिलांचा रुद्रावतार दिसून आला. संतप्त महिलांनी दारूचा अड्डा पेटवून देत दारूच्या बाटल्या फोडल्या.

दारूच्या व्यसनामुळे आमच्या कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने मी रोजंदारी करून लहान मूल आणि वृद्ध व्यक्तीचा सांभाळ करते. यापूर्वी गावात अवैध दारूची दुकाने होती. ती बंद झाल्याने आता गावाच्या शेजारी अनेकांनी अवैध दारूची दुकाने थाटली. यामुळे आबालवृद्धांसह मुले देखील व्यसनाधीन होत आहेत. आमच्या कुटुंबातील कर्ता गेल्याचे दुःख आहे. इतर महिलांवर अशी वेळ येऊ नये. अवैध दारू विक्री कायमची बंद करावी. आंदोलक महिला

## हृदयद्रावक! रोटावेटरमध्ये अडकून शेतकऱ्याचा मृत्यू

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी :रोटावेटरमध्ये पॅण्ट अडकल्याने शेतकऱ्याचा मृत्यू



झाल्याची घटना श्रीरामपूर तालुक्यातील भेर्डापूर येथे घडली. दिलीप आण्णासाहेब कहांडळ (वय ५०) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिलीप कहांडळ हे रविवारी सायंकाळी ५ च्या सुमारास कांदा लागणीसाठी रोटावेटरने शेत जमीन तयार करीत होते. त्यांच्या कुटुंबातील सदस्य ट्रॅक्टर चालवित होते. यावेळी रोटावेटरमध्ये पॅण्ट अडकल्याने दिलीप कहांडळ यांचा पाय रोटावेटरमध्ये ओढला गेला. ट्रॅक्टर बंद करेपर्यंत मांडीपर्यंत पाय रोटावेटरमध्ये ओढला गेला. गंभीर जखमी अवस्थेत नातेवाइकांनी श्रीरामपूर येथे साखर कामगार हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी त्यांना दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारापूर्वीच निधन झाल्याचे घोषित केले. कहांडळ यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. दरम्यान, अशोक साखर कारखान्याचे माजी चेअरमन भाऊसाहेब कहांडळ व प्रगतशील शेतकरी दत्तात्रय कहांडळ यांचे ते बंधू होत.

## विनानंबरच्या दुचाकी चालका कडून २० हजारांचा दंड वसूल



**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी : पोलीस स्टेशन हद्दीमध्ये बऱ्याचशा दुचाकी गाड्या या चोरांकडून अल्पदरात विकत घेऊन विना नंबर प्लेट वापरल्या जातात, अशी माहिती मिळाल्याने राहुरी पोलीस स्टेशनने आज विना नंबर प्लेट गाड्यांची तपासणी मोहीम हाती घेतली.

मोहिमेदरम्यान ३० दुचाकी वाहने विना नंबर प्लेटची आढळून आली. वाहनांवर २०,५०० रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

आजच्या कारवाईतील ३० दुचाकी वाहनांपैकी २४ वाहनांवर दोन्ही बाजूच्या नंबर प्लेट बसवून वाहने मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आलेली आहेत.उर्वरित वाहनांची कागदपत्रे अद्यापपर्यंत नागरिकांनी हजर न केल्याने ती वाहने पोलीस स्टेशन येथे जमा आहेत.

ही मोहीम पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पवार, पोलीस उपनिरीक्षक धर्मराज पाटील, हनुमंत आव्हाड, संदीप ठाणगे, संजय राठोड, बबन राठोड, बापू फुलमाळी, प्रमोद ढाकणे, सचिन ताजने, सतीश कुराडे, जालिंदर धायगुडे यांच्या पथकाने केली आहे

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष पदी रोहित कामडे

**मूल । प्रतिनिधी**



नुकतीच मूल शहरातील इको पार्क रानवारा येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई शाखा, मुल व सावली तालुका सभा संपन्न झाली. विदर्भ अध्यक्ष,प्रा.महेश पानसे यांच्या नेतृत्वाखाली संघाचे मूल व सावली विभाग अध्यक्ष,सतिश राजुरवार,सचिव राजेंद्र वाढई यांच्या उपस्थितीत ही सभा संपन्न होऊन यात नविन वर्षाची कार्यकारीणी घोषीत करण्यात आली.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई,शाखा,मुल तथा सावली उपाध्यक्ष पदी रोहित कामडे यांची नियुक्ती करण्यात आली.यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी,सतिश राजुरवार अध्यक्ष,राजेंद्र वाढई सचिव,धर्मेंद्र सुत्रपवार संघटक,सदस्य डॉ.आनंदराव कुडे ,उपाध्यक्ष सुरेश कन्नमवार,संघटक रोशन बोरकर उपस्थित होते.

## डॉ.रघुनाथ बोरकर राष्ट्रपिता ज्योतिबा फुले सत्यशोधक पुरस्काराने सन्मानित

**तळोधी (बा) । प्रतीनीधी.**



भारतीय स्वदेशी विज्ञान आणि मानव्य विज्ञान संस्था, नागपूर आणि श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी,अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे डव्हान्स इन सायन्स टेक्नॉलॉजी अँड हुमानिटीज इंटरसेक्टींग फॉर ए ब्राईट अँड प्रॉस्परस सोसायटी द्वारा आयोजित इंटरनॅशनल सेमिनार मध्ये भारतीय राज्यघटनेच्या ७५ व्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त शनिवार दि.३० नोव्हेंबर रोजी नागपूर येथील धनवटे नॅशनल कॉलेजच्या समारंभात नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील डॉ. रघुनाथ बोरकर यांना सन्मानित करण्यात आले.

. डॉ.रघुनाथ बोरकर यांनी मागील ४० वर्षात अविरत अनेक ऐतिहासिक आणि पुरातत्वीय संशोधन कार्य केले.आणि त्यांनी लिहिलेल्या बहुमूल्य अशा १७ ग्रंथांचे संपादन केले.तसेच शासन सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी सदोदित संशोधन केले.या बहुआयामी कार्याबद्दल त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून राष्ट्रपिता ज्योतिबा फुले सत्यशोधक हा पुरस्कार श्री शिवाजी सायन्स सोसायटी अमरावतीचे कोषाध्यक्ष व समारंभाचे अध्यक्ष दिलीप इंगोले यांच्या शुभहस्ते त्यांना प्रदान करून गौरविण्यात आले.याबद्दल समाजातील सर्व स्तरातून डॉ. रघुनाथ बोरकर यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात ऊसदर जाहीर न करताच गाळपाला सुरुवात!

# अगोदर ऊस दर जाहीर करा, नाहीतर शेतकरी उसाच्या तोडी बंद करतील- शेतकरी संघटनेचा इशारा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



अहिल्यानगर :२०२४-२५ चा ऊस गाळप हंगामाला अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये सुरुवात झालेली आहे. परंतु या जिल्ह्यातील कुठल्या साखर कारखान्याने अजून पर्यंत मात्र या हंगामातील ऊसदर जाहीर केलेलेच नाहीत.

उसाचे दर जाहीर न करताच कारखान्यांनी गाळप हंगामाला सुरुवात केली आहे.

त्यामुळे आता ऊस दराचा प्रश्न या ठिकाणी पेटणार अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आता अगोदर ऊस दर निश्चित करून ऊसदराचा प्रश्न मार्गी लावावा ही मागणी करण्यात येत आहे व असे केले नाही तर जिल्ह्यातील शेतकरी ऊसतोड बंद करतील असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

अगोदर ऊस दर जाहीर करा, अन्यथा ऊसतोड बंद करण्यात येईल- स्वाभिमानीचा इशारा याबाबत सविस्तर वृत्त असे की, २०२४-२५ च्या गाळप हंगामाला अहिल्यानगर जिल्ह्यात सुरुवात झालेली असून या पार्श्वभूमीवर मात्र जिल्ह्यातील कुठल्याच कारखान्याने उसाचे दर जाहीर केलेले नाहीत व ऊस गाळपाला मात्र सुरुवात केलेली आहे. त्यामुळे अगोदर ऊस दराचा प्रश्न कारखान्यांनी मार्गी लावावा, नाहीतर जिल्ह्यातील शेतकरी ऊसतोड बंद करतील असा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जितेंद्र भोसले यांनी अहिल्यानगरच्या प्रादेशिक सहसंचालकांकडे तक्रार केली असून या तक्रारीत म्हटले आहे की, मागील ऊस गाळप हंगामात बऱ्याच कारखान्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेरून ऊस आणला होता व कार्यक्षेत्रातील ऊसापेक्षा त्या ऊसाला कमी दर दिला आहे.

काही कारखान्यांनी हंगाम सुरू होण्याअगोदर जिल्ह्यातील इतर कारखान्यांच्या बरोबरीने दर देण्याचे जाहीर केलेले असताना त्या तुलनेत मात्र कमी दर दिला आहे. यामध्ये केवळ शर्करांशनुसार दिली जाणारी एफआरपी पूर्ण केली असून इतर उत्पादनांचे म्हणजेच इथेनॉल, स्पिरिट तसेच को जनरेशन आदींचे पैसे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत.ही ऊस उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक असल्याचे देखील या तक्रारीत म्हटले आहे. तसेच यामध्ये पुढे म्हटले आहे की २०११-१२ च्या दरम्यान साखर रिकवरी झोननिहाय दर ठरविण्यात येत होते. अहिल्यानगर, सोलापूर व पुणे झोन एकच रिकव्हरी झोन मध्ये आहेत.

पुणे जिल्ह्यातील कारखाने तीन हजार सातशे रुपये प्रतिटन दर देत असताना अहिल्यानगर जिल्ह्यातील कारखाने मात्र २७०० रुपये दर देत असल्याची तक्रार देखील त्यांनी केली आहे.

प्रति टन शंभर रुपये कमी दर अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळत असल्यामुळे त्या दोन दिवसात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील कारखान्याचे प्रतिनिधी व शेतकऱ्यांचे प्रतिनिधी यांची बैठक घेऊन ऊसदराचा प्रश्न मार्गी लावावा. नाहीतर जिल्ह्यातील शेतकरी उसाच्या तोडी बंद करतील. असा इशारा देखील या माध्यमातून देण्यात आला आहे.

# सरकार सत्तेत येताच शेत तिथे रस्त्यासाठी राज्यव्यापी आंदोलन करणार-शरद पवळे

**पारनेर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचा शेती हा मुख्य व्यवसाय असुन दळणवळणासाठी शेतीला शेतीपूरक व्यवसायासाठी दर्जेदार शेत रस्त्याची गरज आहे तुकडेवारीसह विभाजनानंतर शेतरस्त्यांचा प्रश्न गंभीर बनला असून शेतकरी शेतात वास्तव्यात असल्यामुळे शाळकरी मुले,वृद्ध,अपंग यांची शेतरस्त्यांअभावी मोठी रोजची जीवघेणी कसरत होताना दिसत आहे शेतरस्त्यांच्या समस्येमुळे फौजदारी स्वरूपांच्या घटना दिवसेंदिवस घडताना निदर्शनात येत आहे एका बाजूला निसर्गही शेतकऱ्यांची परीक्षा घेत असून शेतमाला हमीभाव मिळत नाही त्याचबरोबर शेतरस्त्यासाठी शेतकऱ्यांना अर्ज बनवण्यापासून प्रशासकीय कार्यालय ते न्यायालयीन लढा जीव घेणा बनला आहे त्याच्या पिढ्या उद्ध्वस्त होत आहेत यामध्ये अनेकांनी आपल्या जमिनी कवडीमोल भावाने विकल्या आहेत मोठ्या कष्टाने पिक उभे करायचे आणि त्याला बाजारात घेऊन जाता येत नसेल तरी यापेक्षा मोठी शोकांतिका ती काय यासाठी पुन्हा नव्याने येणाऱ्या सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सरकार सत्तेत येताच शेवटच्या शेतकऱ्याला दर्जेदार शेतरस्ता मिळून देण्यासाठी शेतकऱ्यांचा पिढयान पिढया चाललेला संघर्ष संपवण्यासाठी राज्यव्यापी आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले



> शेतकरी समृद्ध तर महाराष्ट्र समृद्ध शेतीला दळणवळणासाठी ब्रिटिशकालीन शेतरस्त्यांच्या हद्द निश्चित होऊन नंबरींचे सर्वेक्षण होऊन त्याला दंड चालू व्हावेत,वहिवाटीच्या शेतरस्त्यांचे सर्वेक्षण होऊन त्यांना गाव नकाशावर घेण्यात यावे शासण निर्णयाप्रमाणे शेतरस्त्यासाठी मोजणी शुल्क व संरक्षण फी लावू नये अर्ज केल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे ६० दिवसात शेत रस्ता मिळावा यासदरर्भात शेतकऱ्यांचे राज्यव्यापी आंदोलन उभारणार- महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवणीचे शरद पवळे, दादासाहेब जंगले पाटील.

> टमहाराष्ट्रात शेतरस्त्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असुन दिवसेंदिवस फौजदारी स्वरूपच्या घटना वाढत चालल्या असुन भावाभावात, शेतकऱ्यांमध्ये आपापसात मोठे वाद निर्माण झाले असुन भविष्यात निर्माण होणार अनर्थ टाळण्यासाठी राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता चळवळ उभी केली असुन शेतकऱ्यांना शेत तिथे रस्ता मिळून देवुन शेवटच्या शेतकर्याला न्याय देण्यासाठी संघर्ष करणार असल्याचे महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे राज्य समन्वयक- दादासाहेब जंगले यांनी सांगितले

# अतिवृष्टीने बाधित तब्बल ५ हजार शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची प्रतिक्षाच!

**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यात जुलै महिन्यात ढगफुटी सदृश्य पाऊस कोसळला.झालेल्या अतिवृष्टीमुळे महसूल विभागाच्या सर्व्हेक्क्षणानुसार तालुक्यातील ३ हजार ७०४ हेक्टर आर शेतातील धान पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.परिणामी शेतकरी आर्थिक संकटात सापडला.शासनाने तत्काळ नुकसानीचे पंचनामे केले.मात्र शासनाच्या उदासीन धोरणामुळे ४ महिन्यांचा कालावधी लोटूनही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसून अजूनही शेतकरी नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेतच आहे.

मूल तालुक्यात खरीप हंगामात धानाचे उत्पादन घेतले जाते.या वर्षी जून महिन्यात पावसाने हुलकावणी दिल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळले.परिणामी शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी बी-बियाणे,खते,कीटकनाशके खरेदी करावे लागल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला.शेतकऱ्यांनी सहकारी सोसायटी,पतसंस्था,जिल्हा बँकेकडून कर्ज उचलून बियाणे खरेदी केल्याने शेतकरी अगोदरच कर्जबाजारी होता.परिणामी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट घोंगावल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे चांगलेच मोडले.अशातच जुलै महिन्यात पावसाला सुरुवात झाल्याने रोवणीला सुरुवात केली.रोवणी सुरू असतानाच ढगफुटी सदृश्य पाऊस कोसळला.झालेल्या अतिवृष्टीने महसूल विभागाच्या सर्वेक्षणानुसार ३ हजार ७०४ हेक्टर आर जागेवरील धान पीक बाधित झाले असून ५ हजार ३० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळले असतानाच अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे चांगलेच कंबरडे मोडले.परिणामी हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई मिळणे अपेक्षित होते.मात्र शासनाने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली असून अजूनही नुकसान भरपाई न दिल्याने शासानाप्रती शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केल्या जात आहे.

तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे ७४० घरांची व ६० गुरांच्या गोठ्यांची पडझड झाली असून जनजीवन विस्कळीत झाले.अनेक नागरिकांचा निवाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आला असून त्यांना इतरत्र निवारा शोधावा लागला.शासनाकडून पंचनामे करण्यात आले मात्र अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नसून नुकसानग्रस्त लाभार्थी नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेतच आहेत.

# लासूरला इच्छापुर्ती महाकाल मंदिरात भस्माआरती संपन्न

## हजारो महिला पुरुष शिवभक्तांची उपस्थिती

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन जवळील गवळीशिवरा रोडवरील सुलतानाबाद येथे ज्योतिषतज्ज्ञ डॉ.शितल अग्निहोत्री यांच्या इच्छापूर्ती महाकाल महादेव मंदिर येथे सोमवारी दुपारी बारा वाजता इच्छापूर्ती महाकाल शिवलिंगावर उज्जैन येथील चक्रवर्ती स्मशानभूमी येथील बम बम नाथजी महाराज यांच्या शुभहस्ते भस्माआरती करण्यात आली. यावेळी छत्रपती संभाजी गर शहरासह पुणे,जालना,नाशिक,अहिल्यानगर आधी जिल्ह्यातून शिवभक्तांची उपस्थिती भस्माआरतीला होती ढोल ताशाच्या गजरात इच्छापूर्ती महाशिवलिंगाला भस्म आरती करण्यात आली हजारो भाविकांची मंदिरात



उपस्थिती होती डॉ. शितल अग्निहोत्री त्यांनी या वेळेस महाकाल दरबार भरवून लोकांच्या अनेक समस्या जाणून घेतल्या व त्यांना त्यावर उपाय सांगितले.

**बम बम नाथजी महाराज ( आश्रम,चक्रवर्ती स्मशान घाट उज्जैन म. प्रदेश) लासुर स्टेशन येथील ज्योतिषतज्ञ डॉ.शीतल अग्निहोत्री यांच्या विनंतीवरून आम्ही थेट उज्जैन इथून सुलतानाबाद येथील इच्छापूर्ती महाकाल मंदिरातील शिवलिंगावर भस्माआरती केली आहे यामुळे शिवभक्तांच्या मनोकामना पूर्ण होतील व ह्या इच्छापूर्ती महाकाल मंदिरातील५ शिवलिंगाजवळ बसून शिवभक्त आपले दुःख दूर करू शकतात एवढी ताकद भस्माआरतीमध्ये आहे त्यामुळे भस्मारतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.**

# माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात मंगळवारी साधणार कार्यकर्त्यांशी स्नेह संवाद

**संगमनेर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर माजी आमदार बाळासाहेब थोरात हे आज मंगळवारी दुपारी ३.०० वा. कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत . या वेळी माजी आमदार सुधीर तांबे म्हणाले की संगमनेरातील आणि राज्यातील पराभव हा धकादायक आहे.आमदार बाळासाहेब थोरात यांनी संगमनेरच्या कानाकोपऱ्यात रस्ते तसेच निळवंडे धरण ,बस स्टँड ,तहसील कार्यालय,प्रांत कार्यालय, कोर्ट अश्या विविध प्रकारे विकास केला आहे . आणि कार्यकर्त्यांची फळी मोठी आहे पण पराभवाचे चिंतन करणे गरजेचे आहे




त्यामुळे कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे..

# साई मंदिर, पूर्णवादनगर, श्रीरामपूर येथे श्री साई सच्चरित ग्रंथ पारायण सोहळ्यास सुरुवात



**श्रीरामपूर । अतुल देसरडा**

पूर्णवादनगर साई भक्तांच्या वतीने तसेच स्व. राजाभाऊ चांडवले यांच्या स्मरणार्थ आयोजित श्री साई सच्चरित ग्रंथ पारायण सोहळ्यास कु. अनुराधा पुष्पलता गोविंदराव आदिकमा. विश्वस्त - श्री. साईबाबा संस्थान, शिर्डी.,मा. लोकनियुक्त नगराध्यक्षा - श्रीरामपूर नगरपरिषद अध्यक्षा - महाराष्ट्र कृषक या उपस्थित होत्या त्यांनी समाजग्रंथाचे वाचन केले व सद्गुरू साईनाथ महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. याप्रसंगी शैलजाताई अकोलकर,शैलाताई बोरावके,सुदेशनाताई चांडवले,सारिकाताई चांडवले,वैशालीताई चांडवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अभिजित लिप्टे, तुषार चांडवले, गोपाल वायदेशकर, रंजन व्हावळ व ग्रंथ वाचक महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# राज्यात यंदा गव्हाचे १५ टक्के क्षेत्र वाढणार; पोषक वातावरण आणि सिंचनासाठी मुबलक पाणीसाठा

**मोहोळ । प्रतिनिधी**

सध्या राज्यात चांगलीच थंडी वाढल्याने किमान तापमानाचा पारा काही प्रमाणात घटलेला आहे. यामुळे गव्हाच्या पेरणीस उशिराने पोषक हवामान तयार झाल्याने गव्हाच्या पेरण्यांना चांगलाच वेग आला आहे. यंदा पोषक वातावरण आणि सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध असल्याने गव्हाच्या क्षेत्रात यंदा वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तविली आहे.राज्यात रब्बी मधील गव्हाचे सरासरी क्षेत्र १० लाख ८५ हजार ०१२ हेक्टर आहे. त्यात २०२२ मध्ये राज्यात १० लाख ५९ हजार ९७३ हेक्टरवर पेरणी झाली होती, तर गतवर्षी राज्यात १२ लाख ८ हजार ८५० हेक्टरवर पेरणी झाली होती. अर्थात गतवर्षी सरासरीपेक्षा गव्हाचे क्षेत्र पंधरा टक्के क्षेत्र वाढले होते. यंदाही जास्त झालेल्या पावसामुळे गव्हाच्या पेरणी क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. , दिवाळीनंतर काही भागात ढगाळ वातावरण तयार झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी उशिराने पेरण्या करण्यास सुरुवात केली.

**११ जिल्ह्यांत पावसाचा अंदाज**

दक्षिण भारतावर धडकलेल्या चक्रीवादळाचा विपरीत परिणाम म्हणून दोन ते पाच डिसेंबरपर्यंत राज्यातील काही ठिकाणी अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला. चक्रीवादळामुळे



राज्याच्या दक्षिण भागात हवामान ढगाळ नोंदवण्यात आले. त्यामुळे थंडी कमी झाली असून आठवडाभरासाठी थंडी 'विश्रांती' घेणार असल्याचे चित्र आहे. सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात पावसाची शक्यता आहे, अशी माहिती तज्ज्ञांनी दिली आहे. विदर्भातही ५ डिसेंबरपर्यंत ढगाळ वातावरण व काही जिल्ह्यात किरकोळ पावसाचीही शक्यता आहे. नागपुरात २४ तासात रात्रीचा पारा ४.९ अंशाने वाढला.

**बदलत्या वातावरणाचा फटका बसण्याचा धोका**

ढगाळ वातावरणामुळे पिकांवर अळ्यांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. विशेषत: हरभरा, तूरीवर अळीचा प्रादुर्भाव वाढू शकतो. वाटाणा व तुरीचा बहार गळण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

# खुशालचंद बांडेबुचे यांचे निधन



**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व खुशालचंद बांडेबुचे यांचे दि. २ डिसेंबर २०२४ रोजी अल्पशः आजाराने निधन झाले. ते संजय बांडेबुचे यांचे वडील होते. त्यांच्या निधनाने कुटुंबावर आणि समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अंतिम संस्कार दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता वैनगंगा मोक्षधाम घाट, भंडारा येथे होणार आहेत. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी श्रद्धांजली सर्वत्र अर्पण केली जात आहे. बांडेबुचे परिवार आणि नातेवाईक यांच्या दुःखात सर्व स्तरातून सहवेदना व्यक्त करण्यात येत आहे.

# मिरीत २२१ ग्रामस्थांची मोफत नेत्र तपासणी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्था व बुधराणी हॉस्पिटल (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने मिरी (ता. पाथर्डी) येथील शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी २२१ ग्रामस्थांची तपासणी केली.शिबिरातील २९ गरजू रुग्णांवर मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया होणार आहे.



शिबिराचे उद्घाटन अखिल भारतीय सेनेचे जिल्हाध्यक्ष तथा कांदा व्यापारी आदिनाथ वनारसे यांच्या हस्ते झाले. हभप गिरीधारी डहाळे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. सूत्रसंचालन ड. स्नेहा शिवाजी वेताळ यांनी केले. अनिता वेताळ यांनी आभार मानले.

# दादागिरीला चोख उत्तर देणार-ॲड.प्रताप ढाकणे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर : मला लोकांनी निवडून दिले असून माझा तांत्रिकदृष्ट्या पराभव झाला आहे . जिथे सर्वसामान्य गोरगरिबांना त्रास होईल, तिथे सर्वात पहिले प्रताप ढाकणे खंबीरपणे उभा राहणार आहे. मस्तवाल झालेल्या ठेकेदारांना व दादागिरीला चोख उत्तर देणार आहे.

भविष्यात मी तुमचा आमदार म्हणून लढणार आहे .सर्वसामान्यांच्या हक्काच्या आड कोणी येणार असेल तर त्याला सुट्टी नाही, असा सज्जड दम ड. प्रताप ढाकणे यांनी विरोधकांना दिला.

शहरातील वीर सावरकर मैदानात आयोजित आभार सभेदरम्यान ढाकणे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार रोहित पवार, पारनेरच्या उमेदवार राणी लंके, योगिता राजळे, राजेंद्र दौंड, बंडू बोरुडे, अर्जुन धायतडक, सविता भापकर, आम आदमीचे सुभाष केकान, शिवसेनेचे सचिन नागापुरे , काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नासीर शेख , राजाजी बुधवंत, वसंत खेडकर, शिवशंकर राजळे आदी उपस्थित होते.

ढाकणे म्हणाले, मुंबई येथे पक्षाने घेतलेल्या बैठकीत राज्यातील नेत्यांनी निवडणुकीतील गैरप्रकाराबाबत मांडलेला लेखाजोखा धक्कादायक होता. निवडणुकीत घडलेला प्रकार महाराष्ट्रवर घाला घालणारा आहे. शेवगाव-पाथर्डी मतदारसंघात चार महिन्यांपूर्वी चमत्कार झाला .लोकसभेनंतर १५०६४ बाळ जन्माला आली व चार महिन्यांतच १८ वर्षाची होऊन मतदार झाली. याबाबत सर्व पुरावे आमच्याकडे आहे. निकाल लागल्यापासून दररोज हजारो लोक मला भेटत आहेत.

मी पडलो की जिंकलो हेच कळेना झाले आहे. लबाडी करून निवडून आलेल्या प्रतिनिधीच्या विरोधात एक लाख ६५ हजार लोकांनी मतदान केले आहे. भविष्यात पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील एक लाख ६५ हजार लोकांचा आमदार म्हणून मी लढणार आहे .आम्ही गरीब माणसासाठी गुंडा आहोत हे लक्षात ठेवा. सत्तेवर



दाब निर्माण करण्याचे काम विरोधकांचे आहे, ते काम मी करणार आहे.आ. रोहित पवार म्हणाले, महाराष्ट्रात भाजपने ईव्हीएमसह जातीवादाचा धर्मवादाचा डेंजर व्हायरस पसरवला आहे.या मतदारसंघात वातावरण पाहून प्रताप ढाकणे आमदार होतील असं वाटत होते. सर्व संस्थांचा सर्वेही त्यांच्या बाजूने होता. आपण हरलो, असे भाजपलाही वाटत होते. लोकांचा स्वाभिमान विकत घेण्यासाठी भाजपने प्रत्येक मतदारसंघात ३० कोटी रुपये पाठवले. पोलीस प्रशासनाचा अधिकाऱ्यांचा गैरवापर केला.गुंडांचा वापर करून दबावतंत्र आणले. या निवडणुकीत सर्व ईव्हीएम मशीन गुजरातवरून आणल्या गेल्या. ज्या कंपनीने मशीन बनवले त्याचे डायरेक्टर भाजपचे खासदारआहे. ईव्हीएमची गडबड करून रडीचा डाव खेळून निवडून आलेल्या उमेदवारांना मिरवणुका किंवा विजयी सभा घ्यायला सुद्धा नैतिकता राहिली नाही. महाराष्ट्रात ९५ मतदारसंघात मतमोजणीवेळी आकडेवारीमध्ये तफावत निघाली आहे. शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातही तफावत आढळली आहे.याबाबत आमचा अभ्यास सुरू आहे. ईव्हीएम मशीनविरोधात आम्ही लढा उभारणार आहोत व यशस्वी होणार आहोत. तुम्ही काळजी करू नका, तुमच्या दिल्लीतल्या प्रश्नासाठी खासदार निलेश लंके व राज्यातील प्रश्नासाठी मी अशा आम्ही दोघे खंबीरपणे उभा राहून तुमचे प्रश्न सोडवू, अशी ग्वाही पवारांनी दिली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# कवी, लेखक देविदास सौदागर यांना डॉ.पी.डी. पाटील यांनी पाच लाखांचे केले आर्थिक सहाय्य

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे हे ४० वे वर्ष होते. या समारोहाच्या समारोप समारंभामध्ये तुळजापूर येथील तरुण लेखक देविदास सौदागर यांस यशवंतराव चव्हाण स्मृती युवा गौरव पुरस्कार देण्यात आला. ज्यांना उसवन या लघुकांदबरीसाठी साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार मिळालेला आहे. तो आपला उदर निर्वाह टेलरिंग काम करून घर चालवतो. आजही त्याची आर्थिक परस्थिती तशी चांगली नाही. आई, वडील, पत्नी व मूलेबाळे असा परिवार आहे. पत्र्याच्या खोलीत तो शिवणकाम करतो. कर्णाच्या मनातलं व काळजात लेण्या कोरताना हे दोन कवितासंग्रह व एक लघु कादंबरी प्रकाशित आहे. या कादंबरीत शिंपी काम करणाऱ्या वर्ग ग्राहकांच्या रेडिमेड कपड्यामुळे वळल्यामुळे आर्थिक अडचणीत आला आहे याचे चित्रण या कादंबरीत आहे.

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील हे समारोप समारंभाचे अध्यक्ष होते. त्यांच्या हस्ते देविदास याला यशवंतराव चव्हाण स्मृती युवा गौरव पुरस्कार दिला गेला. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी समरोहाच्या आयोजांबद्दला अभिनंदन करून देविदास याला.पाच लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य करण्याची घोषणा केली. साहित्य, संगीत. शिक्षण, सांस्कृतिक क्षेत्रात ते सतत कार्य मग्र असतात. अत्यंत संयमी संवेदनशील, रसिक, श्रोते व संयोजक आहेत. देविदास याला ही मदत करून एक कर्तव्य पार पाडले आहे. यावेळी व्यासपीठावर विजय अण्णा बोराडे, बाबा भांड, पं. सतीश व्यास, सचिन ईटकर, दत्ता बाळ सराफ, समितीचे सचिव दगडू लोमटे उपस्थित होते. मराठवाड्यात सर्वदूर लेखक व वाचकांना या घोषणेची आनंदवार्ता प्रसिद्ध होताच डॉ. पी.डी. पाटील यांचे अभिनंदन होत आहे. देविदास सौदागर याला अत्यंत आर्थिक आधार देणारी घोषणा असल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे व समितीच्या पुरस्कार निवडी बद्दल आभार व्यक्त केले जात आहेत.




# करारे स्पर्धेत राजुराच्या खेळाडूंचा डंका, विजेत्यांचा सत्कार

**राजुरा । प्रतिनिधी**

ओकिनवा मार्शल आर्ट्स अकॅडमी जपान अंतर्गत कराटे शोटोकाई इंडिया संस्थेमार्फत आयोजित २७व्या ओएमएए राष्ट्रीय कराटे स्पर्धेत राजुराच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. पुण्यातील श्री छत्रपती शिवाजी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, बालेवाडी येथे २८ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर २०२४ दरम्यान पार पडलेल्या या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत शहरातील चिमुकल्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध पदकांवर मोहोर उमटवली.

स्पर्धेत प्रथमेश पचारे, ओम चुंबले, तक्षू कडुकर यांनी सुवर्णपदक पटकावले; वेदांती रागीट आणि सुरेखा अलोणे यांनी रौप्यपदक जिंकले, तर प्रगती जेनेकर, तनवी रामटेके आणि आराध्या चांदेकर यांनी कांस्यपदकांची कमाई केली. या यशासाठी प्रशिक्षक प्रकाश पचारे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी कठोर परिश्रम घेतले.




यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यासाठी गांधी चौक, राजुरा येथे आयोजित कार्यक्रमात आमदार देवराव भोंगळे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले, या यशामागे तुमच्या मेहनतीचे फळ आहे. स्पर्धा जिंकणे आणि हरणे यापेक्षा मैदानावर खेळाडूवृत्ती जोपासणे महत्त्वाचे आहे. तुम्ही राजुराचे नाव उज्ज्वल केले आहे, याबद्दल मी तुमचा मनापासून अभिमान व्यक्त करतो.कार्यक्रमास शहराध्यक्ष सुरेश रागीट, भाजयुमोचे तालुका महामंत्री आकाश गंधारे, अभिजित कोंडावार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कौतुक सोहळ्याने राजुरा शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# आमदारांच्या पाठबळामुळे बालाघाटातील शेतकऱ्यांची पिळवणूक-डॉ.योगेश क्षीरसागर

## पवनचक्की कंपन्यांच्या अन्यायाविरोधात शेतकऱ्यांनी तक्रारी कराव्यात

**बीड । प्रतिनिधी**

आमदारांच्या आर्थिक हितसंबंधांमुळे पवनचक्की कंपन्यांकडून बालाघाट परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची पिळवणूक सुरू असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केला आहे. अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी पुढे येऊन तक्रारी द्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले असून, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून पाठपुरावा करण्याचे आश्वासनही दिले आहे.



बालाघाट परिसरातील १०-१२ गावांमध्ये पवनचक्की प्रकल्प उभारणीच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनींवर टॉवर उभारले जात आहेत. या प्रक्रियेत कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान केले असून नुकसान भरपाईबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही. टॉवर आणि विद्युत तारा यामुळे बाधित जमिनींची भरपाई न देता शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. याशिवाय, कंपन्यांकडून दिलेले चेक बाऊन्स झाल्याच्या अनेक तक्रारी आहेत.

या सर्व प्रकारांमध्ये पवनचक्की कंपन्यांना आमदारांचे पाठबळ मिळत असल्याचे डॉ. क्षीरसागर यांनी म्हटले आहे. कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांशी उद्धटपणे वागत असून, आमदार हे सर्व प्रकरण बघ्याच्या भूमिकेतून पाहत आहेत. त्यामुळे या प्रकरणात आर्थिक हितसंबंध असल्याचा संशय अधिक गडद झाला आहे.

शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्यास त्यांनी माझ्याशी संपर्क साधून तक्रारी कराव्यात. जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून कार्यवाहीसाठी आपण ठोस पावले उचलू, असे डॉ. क्षीरसागर यांनी सांगितले.डॉ. योगेश क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेतली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी पवनचक्की कंपन्यांच्या कारभाराविरोधात कार्यवाहीचे आश्वासन दिले होते, मात्र अद्याप ठोस उपाययोजना झालेली नाही. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

# राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्ष पदी अॅड.सुभाष राऊत यांच्या नियुक्तीबद्दल अधिसभेत गौरव

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी अॅड. सुभाष राऊत यांच्या नियुक्तीबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभेने अभिनंदनाचा ठराव संमत केला. कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी झालेल्या अधिसभेच्या बैठकीत हा ठराव अधिसभा सदस्य डॉ. नरेंद्र काळे यांनी मांडला. सर्व सदस्यांनी टाळ्यांच्या गजरात या ठरावाला अनुमोदन दिले.



अॅड. सुभाष राऊत यांची राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती तत्कालीन अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या माध्यमातून करण्यात आली. राऊत यांनी महात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष, विद्यापीठ अधिसभा सदस्य, युवक महोत्सव सल्लागार मंडळ सदस्य, तसेच नगरसेवक म्हणून कार्य केले आहे. अॅड. राऊत यांच्या या नियुक्तीमुळे सामाजिक न्याय आणि अन्नवाटप व्यवस्थेत प्रभावी योगदानाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आमदार विजयसिंह यांच्या हस्ते जिल्हा कबड्डी चाचणी व अजिंक्य स्पर्धेचे उद्घाटन

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन व जय हनुमान क्रीडा मंडळ महासांगवी यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाही जिल्हा कबड्डी चाचणी व अजिंक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांचे उद्घाटन गेवराई विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार व बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते ३ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता होणार आहे.



मौजे महासांगवी, ता. पाटोदा येथे होणाऱ्या या स्पर्धेमध्ये किशोर- किशोरी, कुमार-कुमारी तसेच पुरुष व महिला गटांचा समावेश करण्यात आला आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडूंनी सकाळी ९:३० वाजता क्रीडा किटसह उपस्थित राहावे, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

पाटोदा तालुका व परिसरातील क्रीडा प्रेमींनी या उद्घाटन सोहळ्यास व स्पर्धेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन व जय हनुमान क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.स्पर्धा उभारणीच्या निमित्ताने क्रीडा क्षेत्राला चालना मिळावी आणि नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी उपलब्ध व्हावी, असा उद्देश या उपक्रमामागे आहे.

# शाळेतील नियुक्त्यांवर वाद,प्रशासन व गावकरी संघर्षाच्या उंबरठ्यावर

**वर्धा । प्रतिनिधी**

आजदा (गिरड) येथील जिल्हा परिषद शाळेतील पोषण आहार मदतनिस व स्वयंपाकीच्या नियुक्त्यांवरून निर्माण झालेल्या वादामुळे गावकरी व प्रशासन यांच्यात तणाव निर्माण झाला आहे. किरण आणि उमेश खडसे हे २०१७ पासून अनुक्रमे स्वयंपाकी आणि मदतनिस म्हणून कार्यरत होते. मात्र, कोणतीही पूर्वसूचना न देता शाळा व्यवस्थापन समितीने त्यांना हटवून नवीन नियुक्त्या केल्या.

प्रशासनाने यास नियमबाह्य कारवाई घोषित करत चौकशी करून खडसे दाम्पत्याला कामावर पुन्हा रुजू करण्याचे आदेश दिले. परंतु, शाळा व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांनी प्रशासनाच्या आदेशाला मान्यता देण्यास नकार दिला, त्यामुळे शाळेस कुलूप ठोकण्याचा प्रकार घडला. घटनेनंतर समुद्रपूर पोलिसांनी हस्तक्षेप करून शाळेचे कुलूप उघडले. गटशिक्षणाधिकारी



अशोक गिद्देवार, अधीक्षक ललितकुमार बारसागडे, आणि केंद्रप्रमुख विनोद पालवे यांनी घटनास्थळी भेट देऊन मुख्याध्यापकांना नवीन नियुक्त्यांना कामावर ठेवण्याचे आदेश दिले. समस्यांबाबत सूचना देऊन पुढील कारवाई केली जाईल, असेही सांगितले. सध्या गावकरी व प्रशासनामध्ये वाद टोकाला पोहोचला असून, या प्रकरणाचे निराकरण लवकर होईल का, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधान परिषदेवर संधी मिळाल्यास


# विकासाला गती मिळेल विठ्ठल (आबा) गुजर

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश भारतभूषण क्षीरसागर यांना विधानपरिषदेवर संधी दिल्यास बीडच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी मागणी त्यांच्या समर्थक विठ्ठल (आबा) गुजर यांनी केली आहे.

पत्रकात त्यांनी नमूद केले की, डॉ. क्षीरसागर यांनी महायुतीकडून बीड विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवली होती. अत्यंत थोड्या मतांनी पराभूत झाल्यानंतरही त्यांनी बीडच्या विकासाचे कार्य सुरूच ठेवले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बीड मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर निधी आणण्यात आला असून, शहरी व ग्रामीण भागात विकासकामे गतीने पूर्ण करण्यात आली आहेत.

डॉ. क्षीरसागर यांची उच्च शिक्षण आणि कार्यक्षम नेतृत्वाची ओळख असून, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांनी पक्षाचे ध्येय-धोरण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले असून, त्यांच्या कार्याचा मोठ्या प्रमाणावर सकारात्मक प्रभाव पडला आहे.



डॉ. योगेश क्षीरसागर यांनी बीडच्या विकासासाठी ठोस व्हिजन तयार केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार आणि जिल्ह्याचे नेते धनंजय मुंडे यांनी त्यांना विधानपरिषदेवर संधी द्यावी, असे विठ्ठल (आबा) गुजर यांनी आग्रहाने म्हटले आहे. क्षीरसागर यांच्यासारख्या ध्येयवादी आणि प्रगल्भ नेत्याला विधानपरिषदेत स्थान दिल्यास बीडच्या विकासाला नवे आयाम मिळतील, असा विश्वास त्यांच्या समर्थकांनी व्यक्त केला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज चौकातील

# अनधिकृत बॅनरबाजी विरोधात सामाजिक कार्यकर्त्यांचे आंदोलन ; नगरपरिषद प्रशासनाची तत्काळ कारवाई




**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अनधिकृत राजकीय बॅनरबाजीविरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज आंदोलन करण्यात आले. वाहतुकीस अडथळा आणि चौकाच्या विद्रुपीकरणाला कारणीभूत ठरणाऱ्या या होर्डिंग्जविरोधात महाराष्ट्र मालमत्तेच्या निरूपणास प्रतिबंधक कायदा १९९५ अंतर्गत कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली आहे. आंदोलनानंतर तासाभरात नगरपरिषद प्रशासनाने अनधिकृत बॅनर काढण्याची प्रक्रिया सुरू केली.

सामाजिक कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक हे बीड शहराचे महत्त्वाचे ठिकाण असल्याचे सांगून, येथे लावण्यात आलेल्या बेकायदा होर्डिंग्जमुळे शहराचा चेहरा विद्रुप होत असल्याचा आरोप केला. डॉ. गणेश ढवळे यांनी स्पष्ट केले की, अशा बॅनरमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो आणि अपघाताला आमंत्रण मिळते. त्यांनी यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.

डॉ. ढवळे यांनी आरोप केला की, नगरपरिषद प्रशासन राजकीय दबावामुळे आणि आर्थिक हितसंबंधांमुळे अनधिकृत बॅनर काढण्यासाठी टाळाटाळ करते. यामुळे महसूल बुडत असून, कायद्याच्या तरतुदींची अंमलबजावणी होत नाही.

सामाजिक कार्यकर्त्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्देशांची आठवण करून दिली, ज्यामध्ये सर्व राजकीय पक्षांना बेकायदा बॅनरबाजी न करण्याचे आदेश दिले गेले होते. मात्र, या आदेशांचे काटेकोर पालन होत नसल्याची खंत व्यक्त केली.मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी नोटीस पाठवल्याचे सांगितले असले तरी, डॉ. ढवळे यांनी कायमस्वरूपी कारवाईसाठी फौजदारी गुन्हे दाखल करण्याची गरज व्यक्त केली.डॉ. ढवळे यांनी राजकीय नेत्यांना आवाहन केले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा असलेला चौक बीड शहराचे महत्त्वाचे प्रतीक आहे. येथे बॅनरबाजी करून चौकाचे विद्रुपीकरण करू नका. निदान हा चौक तरी बॅनरमुक्त ठेवा.या आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, रामधन जमाले, अशोक येडे, राहुल नागरगोजे यांसारख्या कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

## आ.संदीप क्षीरसागरांचा बीडकरांकडून अभूतपूर्व नागरी सत्कार

# बीडकरांनी मला कधीच एकटे पडू दिले नाही, सगळे बीड माझे कुटुंब-आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या मायबाप जनतेने मला कधीही एकटे पडू दिले नाही. सगळे बीडच माझे कुटुंब आहे. जनसमान्यांच्या आशिर्वादानेच मी दुसर्यांदा आमदार झालो असून त्यांच्यासाठी पूर्णवेळ उपलब्ध असेन असे आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांच्या नागरी सत्कार सोहळ्यात व्यक्त होताना सांगितले. रविवारी (दि.१) रोजी नागरी सत्कार समितीच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांचा, दुसर्यांदा आमदार पदी निवडून आल्याबद्दल सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते.

रविवार (दि.१) रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे नागरी सत्कार समिती, बीड यांच्या आयोजनाने सलग दुसर्यांदा विधानसभा सदस्यपदी निवडून आल्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांचा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी समस्त बीडकरांच्या वतीने आ.क्षीरसागर यांचा अभूतपूर्व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. निवडणुकीत आपल्याकडे शेकडो प्रवेश झाले. परंतु हे प्रवेश कसल्याही अटी आणि शर्ती विना झाले. विरोधकांनी निवडणूक काळात अक्षरशः पैशांचा बाजार मांडला होता. परंतु बीडच्या जनतेने भूमिकेशी तडजोड न करता एकनिष्ठ राहिल्याने माझी साथ दिली. आता मला माझ्या बीडकरांनी निवडून दिले आहे. मी दुसर्यांदा आमदार झालो आहे. परंतु काही लोकांचा प्रश्न आहे, आता आपण सत्तेत नाही मग परत आपल्याला निधी मिळणार नाही! पण आता या गोष्टीची काळजी करायची गरज नाही. मागील तीन वर्षांपासून



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजपा सरकारने अडवून धरलेल्या आहेत. आता या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका होऊन प्रशासक राज जेव्हा हटेल तेव्हा लोक निहाय निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना देणे अनिवार्य असते. सत्ताधाऱ्यांचा त्यातील एक रूपयाही कमी करता येत नाही. त्यामुळे आता विकास कामे आणि निधी यांची चिंता करण्याची कसलीही गरज नसल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले. यासोबतच मी अगोदरच सांगुन टाकले आहे की, 'जरांगे पाटील म्हणतील तसं...' असे सांगत मराठा आरक्षणाबाबत आपली स्पष्ट आणि उघड भूमिका असल्याचेही आ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. त्याबरोबरच पत्नी नेहाताई क्षीरसागर आणि बंधू अर्जून क्षीरसागर यांनीही निवडणूक काळात साथ दिल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास प्रामुख्याने खा.बजरंग सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे, माजी आ.उषाताई दराडे, काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते रविंद्र दळवी, राजेंद्र मस्के, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, उदयसिंह जी देशमुख, जेष्ठ विधीज्ञ ड.बाळासाहेब कोल्हे, जेष्ठ नेते डी.बी.बागल, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद खमरूल, अखिल मौलाना साहेब, इक्बाल मौलाना साहेब, ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेशनचे बीड जिल्हाध्यक्ष हाजी शेख जाकेर महेबुब यांच्यासह त्यांच्या संघटनेचे पदाधिकारी, जेष्ठ विधीज्ञ ड.विवेकानंद सानप, वैजनाथ नाना तांदळे, खुर्शीद आलम यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, महाविकास आघाडीतील सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि बीड शहर, ग्रामीण एकूण मतदारसंघातील सर्व भागातून बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षा हेच स्वप्नपूर्तीचा आनंद देणारे माध्यम-प्रा.योगेश वानखेडे

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट व स्वामी विवेकानंद अभ्यासिका हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने चजण अंतर्गत अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षतेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. योगेश वानखेडे, डॉ. सपना जयस्वाल, आणि ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. सुनंदा गिरडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि प्राध्यापक वर्ग देखील सहभागी झाले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. प्रा. प्रीती दुबे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि ग्रंथालय आणि त्यातील पुस्तके यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रा. योगेश वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना सांगितले की, पुस्तके आपल्या




जीवनाला आकार देतात आणि स्पर्धा परीक्षा आपल्या स्वप्ने पूर्ण करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना लक्ष्य ठरवून जिद्द आणि चिकाटीने कार्य करण्याचे प्रेरणादायक संदेश दिले.

डॉ. उमेश तुळसकर यांनी वाचाल तर वाचाल ह्या मंत्रासह पुस्तके वाचण्याचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून, पुस्तके आत्मनिर्भर जीवनाची प्रेरणा देतात आणि जीवनाला दिशा देतात, असे सांगितले. डॉ. सपना जयस्वाल यांनी अभ्यासिकेचे महत्त्व आणि त्याचा दैनंदिन जीवनावर होणारा सकारात्मक परिणाम सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रांजली थुल यांनी केले, तर डॉ. सुनंदा गिरडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

## विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान असणे काळाची गरज-डॉ.श्रेया बोकारे

**मूल । प्रतिनिधी**

भविष्यातील प्रगतीसाठी विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान अत्यावश्यक आहे, असे मत भारत सरकारच्या मुंबई येथील सी-डेकच्या सहसंचालिका डॉ. श्रेया बोकारे यांनी व्यक्त केले. त्या सुभाष उच्च प्राथमिक शाळा, मूल येथे आयोजित संगणक साहित्य उद्घाटन कार्यक्रमात बोलत होत्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन बेंटली सिस्टीम, मुंबईचे व्यवस्थापक स्नेहकुमार बोकारे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष नरसिंग गणवेंनवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळा सल्लागार समितीचे अध्यक्ष प्रा. मारोतराव पुल्लावार, उपाध्यक्ष सुखदेव चौथाले, सुवर्णा पिपरे, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष इंदू मडावी, रुपेश मारकवार, माजी सैनिक मारोती कोकाटे, उषा शेंडे आणि उषा थोराक यांची उपस्थिती होती.

शाळेचे मुख्याध्यापक अविनाश जगताप यांनी प्रास्ताविक भाषणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत संगणक शिक्षणाचा




भर देण्यात आल्याचे सांगितले. मध्यमवर्गीय पालकांच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. श्रेया बोकारे म्हणाल्या, शालेय शिक्षणात संगणकाचे शिक्षण अत्यावश्यक असून, पालकांनी विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

स्नेहकुमार बोकारे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान आत्मसात करून भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी करावी, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक शिक्षक बंडू अळ्लीवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अजय राऊत यांनी मानले. यावेळी शाळेच्या विविध समित्यांचे पदाधिकारी, सदस्य, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळसकर फार्मसी कॉलेजमध्ये संविधान दिवस साजरा



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था अंतर्गत तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसी येथे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. प्रदीप रघाटाटे होते. त्यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन करून विद्यार्थ्यांना संविधानातील मुल्यांची जाणीव करून दिली. त्यांनी संविधानाच्या महत्त्वाबद्दल मार्गदर्शन करताना सांगितले की, संविधान हा देशाच्या विकासाचा पाया आहे आणि त्यातील तत्त्वे प्रत्येक नागरिकाने आत्मसात करायला हवीत. कार्यक्रमाला प्रा. राकेश जोशी, प्रा. पायल बकाणे, प्रा. शीतल पाटील, प्रा. अंजू तन्ना, प्रा. नयनतारा पाचपोर यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शीतल पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. नयनतारा पाचपोर यांनी केले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## भाजपने ठाकरेंसारखेच एकनाथ शिंदेंना फसवले

# माजी मुख्यमंत्र्याचा आरोप;पैसा अन् सत्तेच्या बळावर लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न

**मुंबई (वृत्तसंस्था)**

भाजपने उद्धव ठाकरे यांच्यासारखीच एकनाथ शिंदे यांची फसवणूक केल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. भाजपकडून पैसा व सत्तेच्या बळावर लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, महायुतीने यंदाची विधानसभा निवडणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात लढवली. त्यामुळे शिंदे यांची फसवणूक होणार नाही अशी अपेक्षा होती. पण भाजपने त्यांची उद्धव ठाकरे यांच्यासारखीच फसवणूक केली. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव यांची फसवणूक केली होती. त्याच पद्धतीने आता शिंदे यांना फसवण्यात आले. सत्ताधाऱ्यांकडून निवडणुकीत पैसा व



सत्तेचा गैरवापर करून लोकशाही नष्ट करण्यात आली. सत्ताधाऱ्यांनी सत्तेचा गैरवापर करून पोलिसांच्या गाड्यांमधून पैसे वाटले. पण निवडणूक आयोगाने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्याने केवळ बघ्याची भूमिका घेतली.

पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी ईव्हीएमवरही संशय व्यक्त केला. ते म्हणाले, केंद्रीय निवडणूक आयोगाला स्वायत्तता आहे. सध्या मुक्त वातावरणात पारदर्शकपणे निवडणुका घेतल्याचा दावा केला जात आहे. पण त्यानंतरही जनतेच्या मनात ईव्हीएमविषयी संशय आहे. आयोगाला ईव्हीएम सुरक्षित वाटते, तर मग सर्व मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांच्या मोजणीला किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील इलेक्ट्रॉनिक तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याला सरकार का घाबरते? सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार ठराविक मतदान यंत्रांतील मतचिठ्ठ्यांची तपासणी झाली, तरी त्यातून काही निष्पन्न होणार नाही. कारण, ठराविक मतदान यंत्रांमधील डेटा नष्ट केला जाऊ शकतो, असे चव्हाण म्हणाले.पृथ्वीराज चव्हाण यांनी महायुतीवरही घणाघात केला. कोणत्याही निवडणुकीत जनतेचा विश्वास असणे अत्यंत गरजेचे आहे. पण जनतेला ईव्हीएमवर थोडाही विश्वास राहिला नाही. त्यामुळे जनतेतून पुन्हा एकदा बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची मागणी होत आहे. लोकसभा निवडणुकीत जनतेने केंद्रातील भाजपा सरकारवर तीव्र नाराजी दर्शवली. पण त्यानंतर अवघ्या ४ महिन्यांत अचानक मतदारांच्या मनात एवढा बदल होऊन भाजप महायुती सरकारविषयी एवढा विश्वास संपादन होणे ही अशक्य व अविश्वसनीय गोष्ट आहे, असे ते म्हणाले.

# भाजपकडून एकनाथ शिंदेंची कोंडी करण्याचा प्रयत्न आमदार बच्चू कडू यांचे वक्तव्य,राजकीय वर्तुळात चर्चा

**अमरावती (वृत्तसंस्था)**

भारतीय जनता पक्षाकडून तुमची कोंडी करण्याचा प्रयत्न होईल, असे मी एकनाथ शिंदे यांना अनेकवेळा सांगितले असल्याची माहिती आमदार बच्चू कडू यांनी दिली आहे. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू असून एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा आहे. यावर आमदार बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

आमदार बच्चू कडू म्हणाले, मी एकनाथ शिंदे यांना सांगितले होते, बऱ्याचवेळा सांगितले होते की भारतीय जनता पक्षाकडून तुमची कोंडी करण्याचा प्रयत्न होईल. कारण एकनाथ शिंदे हे एकमात्र मुख्यमंत्री असे होते की रात्री दोन वाजता देखील सर्वसामान्य माणसांना भेटायचे. असा पहिला मुख्यमंत्री मी पाहत होतो. त्यामुळे भाजपला कधीकाळी असे वाटले होते की एकनाथ शिंदे यांना आपण थोडे दाबून ठेऊ, असे बच्चू कडू म्हणाले आहेत.पुढे बच्चू कडू म्हणाले, एकनाथ शिंदे सत्तेत असल्याने त्यांना दाबून ठेवणे शक्य झाले नाही. मात्र, एकनाथ शिंदे यांचे काम बोलत होते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांची कोंडी करण्याचा प्रयत्न होणार होता. कारण भाजपला एकहाती सत्ता घ्यायची आहे, असे बच्चू कडू म्हणाले आहेत.दरम्यान, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमताने यश मिळाले आहे. मात्र, निवडणुकीचा निकाल लागून आता आठ दिवस होऊन गेले तरी देखील अद्याप सरकार स्थापन झाले नाही. मुख्यमंत्री पदावरून महायुतीमध्ये मतभेद असल्याचे बोलले जात आहे. तसेच मुख्यमंत्री पद नाही तर गृहमंत्री पद देण्याची मागणी शिंदे गटाकडून केली जात आहे. मात्र, यास देखील भाजपचा विरोध असल्याचे दिसत आहे.सरकार स्थापनेसाठी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार दिल्लीत गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेण्यासाठी जाणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र, एकनाथ शिंदे हे प्रकृतीच्या कारणास्तव या बैठकीला जाणार नसल्याचे समोर आले आहे. एकनाथ शिंदे सध्या ठाणे येथील त्यांच्या निवासस्थानी विश्रांती घेत आहेत.



